भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०८/२०१७

**१) ट्रेलर चालकाने स्विप्ट डिझायर गाडीला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०८/२०१७ चे १५.२० वा. दर. यातील फिर्यादी शामसुंदर गोवर्धनदास केला वय ५६ वर्ष, रा. पटेल नगर लोणार जि. बुलढाणा हा आपले कार क्र. एमएच २८ जी ७५७१ मारोती स्विप्ट डिझायर ने कुंटुबासह राजनंदगावा वरुन लोणार कडे जात असतांनी यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रेलर चौकातील सिग्नलकडे व समोरचे वाहनाकडे लक्ष न देता आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे कारला मागेहुन धडक दिल्याने कारचे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) गोसे धरणाचे कालव्यात अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले. . :–**

दिनांक १७/०८/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी हा त्याचे शेत शिवारात चंडकापुर कडे जात असता गोसे धरणाचे उजव्या कालव्यात एक अनोळखी इसमाचे प्रेत वय अंदाजे ६५ वर्ष, वयोगटातील वाहत येत दिसल्याने फिर्यादीने पोस्टेला येवुन तोंडी तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) इसमाचे प्रेत जळालेल्या स्थितीत मिळुन आले . :–**

दिनांक १७/०८/२०१७ चे १०.०० वा. पुर्वी यातील मृतक विक्की नेवींदराम गोकलानी वय ३० वर्ष, रा गोंदिया जिल्हा गोंदिया यांचे प्रेत बोरी शिवारात जळालेल्या स्थितीत मिळुन आल्याने पो.स्टे. तुमसर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**४) अज्ञात वाहनाच्या धडकेत इसम जखमी झाल्याने मृत्यु . :–**

दिनांक १५/०८/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील मृतक सुरेश महादेव नेवारे वय ५५ वर्ष, रा. आमगाव आदर्श हा आपले बकऱ्यांचा चारा आणण्याकरीता पायी रस्त्याने जात असतांनी शहानंद धाब्याजवळ यातील अज्ञात वाहनाने धडक मारल्याने अपघातात मृतक सुरेश महादेव नेवारे वय ५५ वर्ष, रा. आमगाव आदर्श हा जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा. रु. भिवापुर येथे आनले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने पो. स्टे. भिवापुर जि. नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०८/२०१७ चे ०२.५२ वा. दर. यातील मृतक सचिन मोडकु सार्वे वय ३५ वर्ष, रा. गोडेगाव हा दारु प्राशन करुन त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र.००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १७/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८४ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.